Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

October-November-December-2018

Vol. 5 Issue 4

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 92 | बेरिस्टर अनिरुध्द धोपेश्वरकर (मराठीतील अतिवास्तववादी कादंबरी) | प्रा. प्राची जोशी | 403 |
| 93 | भारतीय लोकशाहीत माहितीचा अधिकार आणि सुशासन | प्रा. संजय भालेराव | 415 |
| 94 | कर्जत तालुक्यातील बचत गटांच्या वित्त पुरवठ्याचा अभ्यास जिल्हा अहमदनगर | प्रा. वनदास पुंड | 419 |
| 95 | आचार्य कौटिल्या यांची सार्वजनिक करव्यवस्था आणि वर्तमानकालीन प्रासंगिकता | प्रा. हेमराज चौधरी | 422 |
| 96 | पाहिजे जातीचे या नाटकातील जीवनभाष्य | डॉ. भूषण बंड | 425 |
| 97 | औंध संस्थांनातील चित्रकलेचा ठेवा | डॉ. स्वाती काळभोर | 428 |
| 98 | योग आणि आसनांचे महत्त्व व फायदे | डॉ. सुधीर सहारे | 433 |
| 99 | २१व्या शतकात महात्मा गांधींच्या विचारांची प्रस्तुतता | प्रा. जी. जी. राऊलवाड | 437 |
| 100 | उत्क्रांत लेणी मानवी जीवनमूल्यांचा उजेडनामा | प्रा. अरविंद पाटील | 439 |
| 101 | आदिवासी चित्रकला : लग्न चौक | डॉ. अंजली मस्करेन्हस | 443 |
| 102 | परंपरागत भारतीय राज्य व्यवस्थेचा जगावर परिणाम | डॉ. विमल राठोड | 449 |
| 103 | भारतीय शिक्षण पद्धतीत आदिवासी जमातीच्या पाल्यांच्या शैक्षणिक समस्या व उपाय योजना | डॉ. नासिर गिरासे | 452 |
| 104 | आधुनिक महाराष्ट्रातील शिक्षणाच्या बहुजनीकरणात महात्मा फुले यांची भूमिका | प्रा.कल्याण वटाणे व प्रा.एच.पी.भैलुमे | 455 |
| 105 | मुस्लिम व मुस्लिम मराठी साहित्य संकल्पना | डॉ.शामराव गायकवाड | 458 |
| 106 | लोकसाहित्य:संकल्पना, स्वरूप व प्रयोजन | डॉ.भूषण बंड | 462 |
| 107 | भारतातील शहरी अर्थव्यवस्थेचा अभ्यास | डॉ.सुरेश बन्सपाल | 465 |
| 108 | स्त्रीवादी काव्याचा अभ्यास | डॉ.प्रल्हाद होंडे | 470 |
| 109 | महानुभाव पंथाचे प्रवर्तक : महात्मा चक्रधर स्वामी | डॉ.सदाशिव सरकटे | 475 |
| 110 | माळशिरस तालुक्यातील सहकारी चळवळ | महेश घाडगे | 479 |
| 111 | सखाराम बाइंडर : एक दृष्टीक्षेप | डॉ.बाबाराव ठावरी | 484 |
| 112 | भारतातील विदेशी भांडवल व परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक | डॉ.अंकुश जाधव व प्रा.विलास उमरे | 491 |
| 113 | १९९० नंतरच्या ग्रामीण साहित्यातून व्यक्त झालेली ग्रामजीवनाची जळजळीत वास्तवता | डॉ.संगीता शेळके | 499 |
| 114 | संगोल्यातील डाळींब | महेश घाडगे | 502 |


## कोंकणी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 115 | 'कोकणी साहित्यातलो विनोद : एक सरियस चिकित्सा'(वेंचीक साहित्याचे शास्त्रीय तशेच ऍकडेमिक विश्लेषण) | डॉ.हनुमंत चोपडेकार | 505 |
| 116 | र.वि.पंडिताचे कवितेंतलो व्यक्तिगत जिणे-प्रभाव | डॉ.राजय पवार | 515 |
| 117 | डॉ.राजय पवार ह्यांच्या ओली सुकी ललित निबंदातली आशयात्मक अभिव्यक्ती | प्रा.प्रियांका परब | 525 |


## उर्दू विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 118 | جنوبی ہند میں اردو ناول کی ایک معتبر اواز۔۔۔نور الحسنین | محمد ابرار الحق عبدالظاہر امجد | 533 |
| 119 | عصمت چغتائی کے ناول (احساس زن کا آئینہ خانہ) | ڈاکٹر قریشی عتیق احمد | 537 |


या विशेषांकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
UGC Approved Journal | Impact Factor - (SJIF) – 6.261 | October-November-December 2018 | Vol. 5, Issue 4

# महानुभाव पंथाचे प्रवर्तक : महात्मा चक्रधर स्वामी

डॉ. सदाशिव सरकटे
कला व विज्ञान महाविद्यालय
शिवाजीनगर, गढी ता. गेवराई,

महाराष्ट्राला संतांची तेजस्वी परंपरा लाभली आहे. महाराष्ट्रातल्या समाजप्रबोधनाची मुळं खुप खोलवर रुजलेली आहेत. संताच्या पुरोगामी व विद्रोही विचारांचा बलदंड व कृतिशील वारसा महाराष्ट्राला लाभला आहे. त्यामुळे भारतीय इतिहासात या संतांची परंपरा सुवर्णअक्षरांनी नमूद केली आहे.अशा संत परंपरेमध्ये महानुभाव पंथाचे प्रवर्तक महात्मा चक्रधरस्वामी यांचा उल्लेख करावा लागेल.

महानुभाव पंथाचे प्रवर्तक संत चक्रधरस्वामी यांचा जन्म २० ऑगस्ट १२२१ ( शके ११४३) रोजी गुजरात राज्यातील भरवसा या गावी झाला.या गावाला आज भडोच म्हणून ओळखले जाते.भडोचच्या विशाल देव नामक प्रधानाचा पुत्र हरिपाळदेव याच्या मृत शरिरात प्रवेश करुन द्वारावतीच्या श्री. चांगदेव राऊळांनी जो अवतार धारण केला तो अवतार म्हणजे श्री. चक्रधरस्वामी होत[१] .

हरिपाळरुपाने गुजरात मध्ये राहाणाऱ्या या अवताराने पत्नीशी झालेल्या बेबनावाच्या निमित्ताने ऐन तारुण्यात महाराष्ट्रात प्रवेश केला अणि आयुष्याच्या अखेरपर्यंत ते महाराष्ट्रातच राहिले.त्यांनी प्रवर्तित केलेल्या महानुभाव पंथाची स्थापना व त्या पंथाचा विकासही इथेच झाला. ज्या समाजकरुणेतून स्वामी या नव्या पंथाच्या प्रवर्तनास सिध्द झाले, तो पंथ मराठी मातीशी आपले घनिष्ठ नाते सांगणारा होता. म्हणूनच त्यांनी आपल्या तत्त्व-विचारांची भाषा म्हणून मराठी लोकभाषेचा आग्रहपुर्वक स्वीकार केला. तसे पाहिले तर चक्रधरस्वामी हे बहुभाषी होते. गुजराती, संस्कृत, मराठी इत्यादी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. पण बहुजन समाजाला संस्कृत भाषा समजत नसल्याने त्यांना त्यांच्याच भाषेत धर्माचे स्वरुप समजावून सांगणे आवश्यक आहे, हे त्यांनी आपले जीवनकार्य मानले.यासाठी त्यांनी निष्ठेने मराठीचा पुरस्कार केला. महाराष्ट्राची प्रादेशिक अस्मिताही प्रथम त्यांनीच जागवली व महाराष्ट्राच्या आधुनिक संस्कृतीचा पाया घातला.आपल्या शिष्यांना त्यांनी 'महाराष्ट्री असावे' असा उपदेश केला[२].

१.समाजक्रांतीचे अग्रदुतः

महाराष्ट्राच्या प्रादेशिक अस्मितेचा उध्दाता आणि मराठी भाषेचा व संस्कृतीचा कैवार घेणारा महावक्ता या नात्याने स्वामी चक्रधरांचे कार्य असाधारण स्वरुपाचे म्हटले पाहिजे. स्वामीचक्रधरांनी यादवकाळात प्रचलित असलेल्या वैदिक कर्मकांडाच्या चातुर्वर्ण्यप्रणित व्यवस्थेच्या विरोधी साध्या सरळ भक्ती मार्गाचा आणि सामाजिक समतेचा प्रसार केला. यादवकालीन चातुर्वर्ण्य, जातीभेद, विटाळ चांडाळ,मोक्षमार्गातील स्त्री-पुरुष विषमता, वैदिक धर्माचे संस्कार इत्यादी गोष्टींच्या विरोधात ते नुसते बालेले नाहीत तर त्यांनी व्यवहारात तशी समता प्रस्थापित करून दाखवली. म्हणूनच त्यांनी आपल्या पंथाचे दरवाजे अठरापगड जातीतील लोकांना खुले ठेवले. पारंपारिक रुढीच्या ओझ्याखाली दबलेल्या व स्वत्त्व हरवलेल्या माणसाचा ऐहिक विकास व्हावा आणि पारमार्थिक उध्दार व्हावा या हेतूने स्वामी या नव्या पंथप्रवर्तनास प्रवृत्त झाले होते.

तत्कालीन समाजात अनेक देवदेवतांचा उपासनेचा दिवसेंदिवस वाढणारा जोर संत चक्रधरांनी कमी केला आणि एक परब्रह्म परमेश्वराच्या कृपाछत्राखाली आपल्या अनुयायी वर्गाला एकत्र करण्याचा प्रयत्न केला. वेद विषमतेचा मुळ आधार आहे. त्यामध्ये शुद्रातिशुद्रांच्याच नाही तर ब्राह्मणादी सर्वच वर्णाच्या स्त्रियांना दूर ठेवले होते. म्हणून वेदांच्या शास्त्राचे उदिष्ट ब्राह्मण व क्षत्रियांद्वारा इतर समाजाचे शोषण करणे हे होते. वेदांचा हा अधिकार आणि त्याच्या आधारावर विषमता पसरविणाऱ्या चार्तुवर्ण्याला नष्ट करण्याचा प्रयत्न संत चक्रधर स्वामींनी केला[३].

Scanned with CamScanner

तीर्थक्षेत्र, व्रत, दान यासारख्या धर्म कृत्यांमध्ये जीवनाची सार्थकता मानणे ,सर्वस्व अर्पण करुन संपत्तीचा अपव्यय करणे त्यांना मान्य नव्हते. म्हणुनच या सर्व व्यर्थ कर्मापासुन समाजाला परावृत्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्त्री-पुरूष आणि विभिन्न वर्णामध्ये जाणून बुजून विषमता निर्माण करणाऱ्या वैदिक परंपरेचा त्यांनी स्वीकार केला नाही.वर्ण समानता आणि स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.'चातुर्वर्ण्यचरेद् भैक्ष्यम्'[४] यानुसार त्यांनी केवळ तीन वर्णामध्ये परस्पर खाण्या-पिण्याच्या व्यवहाराला संमती दिली नाही तर तीन वर्णाप्रमाणेच शुद्रांमध्येही हा व्यवहार सुरू केला. स्वत: चक्रधर स्वामी अस्पृश्यता मानत नव्हते. ते आपल्या अनुयायांना असा आदेश करायचे की 'महारवाडाहौनि धर्म काढावा'[५] ( सुत्रपाठ - आचार -१५९) म्हणजे अस्पृश्याच्या वस्तीत जाऊनही धर्माचे ज्ञान प्राप्त करून घेतले पाहिजे. त्यांच्या हातचे अन्नपाणी ग्रहण करण्यात त्यांना थोडाही संकोच वाटत नव्हता.

चारही वर्णियांच्या घरचे भिक्षान्न भोजन करण्याची अनुमती देऊन चक्रधर स्वामींनी भोजनाबाबतच्या निषेधावर चांगलाच आघात केला. बाराव्या शतकातील समाज स्थितीचे वर्णन करताना स्वामी म्हणतात,

'अवघा जनु थकला ठेला असेI
तयाचे थक फेडिता कव्हणी नसेI
तु का थकला हे कुणी ना पुसे I '[६]

बहुजन व दलित समाज थंड गोळयाप्रमाणे जगत असल्याची जाणिव संत चक्रधरस्वामींनी करुन दिली. अशा गलितगात्र समाजाला जागे करण्याचे कार्य संत चक्रधरस्वामींनी केले.

मराठी भाषेविषयीचे प्रेम, सामान्य जनतेविषयी कळवळा, सोप्या भाषेत लोकांचे प्रबोधन करण्याची कला ही चक्रधरस्वामींची खास वैशिष्टये होती. आचार-विचारांच्या दृष्टीने एक उदारमतवाद, मानवतावाद जोपासण्याचे कार्य चक्रधरस्वामींनी केले. संत ज्ञानेश्वराच्या उदयापुर्वी सुमारे शंभर वर्षे अगोदर महानुभाव पंथाचे प्रवर्तक सर्वज्ञ श्री. चक्रधरस्वामींनी केवळ तात्त्विक क्षेत्रातच नव्हे तर दैनंदिन व्यवहारात देखील स्त्रिया आणि शुद्रातिशुद्र हे जे हिंदू समाजाचे दोन उपेक्षित आणि दलित असे बहुसंख्य घटक होते, त्यांना धार्मिक समतेचे हक्क आणि दर्जा प्राप्त करून देण्यासाठी महानुभाव पंथाची स्थापना करुन बाराव्या शतकात मोठया धडाडीने प्रयत्न केले. यादव साम्राज्याच्या दिग्विजयाच्या काळात जेव्हा व्रतवैकल्ये, यज्ञ याग इत्यादी कर्मकांडाचे प्रस्थ बेसुमार माजलेले होते. त्याचे महात्म्य वर्णन करणारे 'चतुर्वर्ग चिंतामणी 'सारखे संस्कृत ग्रंथांचे प्रस्थ वाढत होते, अशा परिस्थीत महाराष्ट्रात आपली समाज क्रांतीची घोषणा अंमलात आणण्याचे धैर्य करणारा थोर महात्मा म्हणजे श्री चक्रधर स्वामी होय [७].

वैदिक धर्माने अव्हेरलेल्या मराठी भाषेला धर्म भाषेचे प्रामाण्य, पावित्र्य आणि प्रतिष्ठा मिळवून देवून मराठीचा प्रसार त्यांच्या महानुभाव पंथाने काबूल-कंदाहार पर्यंत केला. ईश्वर अणि भक्तांचे नाते कसे असावे याबद्दल ते म्हणतात " ईश्वराला पाहण्यासाठी कोणत्याही कृत्रिम प्रकाशाची गरज नसते. तो स्वयंप्रकाशी आहे, मात्र भक्ताचा जसा भाव असेल तसा ईश्वर त्याला दर्शन देतो. "[८]

२. अंधश्रध्दा निर्मूलनाचे प्रवर्तक :

चक्रधरस्वर्मीनी सर्व वर्णातील स्त्रियांना ममतेची वागणूक दिली. महार -मांगाच्या वस्तीत दिलखुलासपणे जेवण केले.भंग्यांची गावसफाईची कामे निष्ठेने केली. समस्त दु:खितांचे अश्रू पुसण्यासाठी त्यांनी आपले जीवन वेचले. महानुभाव पंथाच्या गुरुंनी 'ग्रामसफाई ' हे धर्मव्रत स्विकारले होते. पंथगुरु शिष्याच्या डोक्यावर खराटा मारुन दिक्षा देत असत. ग्रामसफाईच्या मागे जनसेवा ही तर भावना होतीच पण त्यासोबत समाजातील शतकानुशतकांची विषमता, दैन्य, लाचारी हया घाणयुक्त प्रवृत्तींना नष्ट करण्याची प्रेरणा जनतेला मिळावी ही सुध्दा भावना होती.

Scanned with CamScanner

महानूभाव पंथातील प्रत्येक संन्याशाने प्रत्यक्ष समाजसेवा केली पाहिजे,असा संत चक्रधरस्वामींचा दंडक होता. आपल्या पंथातील शिष्यांसाठी त्यांनी घातलेली बंधने -

'परनिंदा, परवार्ता, करु नये, काम, क्रोध्, लोभ ही तिन्ही नरकद्वारे आहेत, काम, क्रोध, मद, मत्सर यांचा त्याग म्हणजे संन्यास होय. एकत्र खानपान करा. गुरुच्या कथा वार्ता करा, पण पाच-सात दिवसांपेक्षा अधिक एकत्र राहू नका.'[९]

त्यांच्या भ्रमंतीच्या काळात रामदेव नावाच्या एका भक्ताशी त्यांची भेट झाली. रामदेवचे वडील चार दिवपसांपुर्वीच मरण पावले होते. त्यामुळे तो सुतक पाळत होता. त्यांनी स्वामींला विचारले, "आपणासाठी भोजन करायची फार इच्छा आहे. पण दुर्दैवाने यावेळी मी सुतकात आहे. माझ्या घरची भाकरी आपण कसे घ्याल ? तेव्हा संत चक्रधरस्वामी म्हणाले , का नाही? भाकरी जरूर आणा. मी तिचा आवश्य स्विकार करीन.या प्रकारची अस्पृश्यता मी बिलकूल मानत नाही." स्त्रियांच्या मासिक धर्माचीही ते अस्पृश्यता मानत नव्हते. एकदा उमाइसा नावाची त्यांची शिष्या मासिक धर्मात होती. ती स्वामींच्या दर्शनाला आली व दुरुनच तिने त्यांच्या चरणांना नमस्कार केला. संत चक्रधरस्वामींनी जाणूनबुजून आपल्या अंगठयाने तिला स्पर्श केला आणि नंतर विनोदाने म्हटले , "बाई माझ्या अंगठयाने तुला स्पर्श केला . आता त्याला कापावे लागेल आणि पवित्र करण्यासाठी केवळ वाराणसीलाच नाहीतर केदार सारख्या पवित्र क्षेत्री घेऊन जावे लागेल नाही का[१०] ?"

त्यांच्या मते "शरिराच्या इतर दारावाटे जसा मळ बाहेर पडतो, तसेच स्त्रीच्या योनीतून तीन दिवस रज वाहात असतो. नाकातून वाहणाऱ्या गोष्टीला आपण अस्पृश्य मानतो काय ? यामुळेच अशा प्रकाराची अंधश्रध्दा पाळणाऱ्या, पवित्र- अपवित्रतेचे अवडंबर निर्माण करणाऱ्या ब्राह्मणांना त्यांनी 'सर्वाधम 'म्हटले आहे. अहिंसेला त्यांनी अत्यंत उच्च स्थान दिले होते. त्यांनी मद्याचाही निषेध केला. "उन्मत्त द्रव्य पिऊ नये" असे लोकांना सांगतले [११] .

आजही हजारो अस्पृश्यांना मद्य आणि मांस यापासून वर्ज्य ठेवण्याचे श्रेय चक्रधर स्वामींच्या महानुभाव पंथालाच आहे. महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान व आचारधर्म आध्यात्मिक व सामाजिक बाबतीत पुरोगामी आहे. जीव व शिव यांचे ऐक्य हा भारतीय तत्वज्ञानाचा गाभा, पण जीव व ईश्वर यांचे ऐक्य संत चक्रधर मान्य करीत नाहीत, त्यांनी जीव हा ईश्वराशी तादात्म्य पावत नाही असे सांगून आपल्या स्वतंत्र चिंतनाचे वेगळेपण दाखविले आहे. चक्रधरस्वामींनी होम, हवन, यज्ञयाग याला विरोध केला आहे, म्हणून त्यांचा महानुभाव संप्रदाय अवैदिक आहे असे म्हणता येईल.

असा अहिंसक पंथ चक्रधरस्वामीनी अंधश्रध्देतून समाजाला बाहेर काढण्यासाठी स्थापन केला होता. बौध्द व जैन धर्माप्रमाणे स्त्रियांना संन्यास घेण्याचा अधिकारही त्यांनी मान्य केला. म्हणून महानुभाव पंथ हा अधंश्रध्दा घालविणारा पंथ होता.

संत चक्रधर स्वामी हे सनातनपंथी, पुराणमतवादी व पढिक पंडित नव्हते तर ते बुध्दिप्रामाण्यवादी संत होते. जनतेला सरळ- सोप्या जीवन पध्दतीची ओळख करून देणे हे आपले कर्तव्य आहे, असे ते जन्मभर मानत होते आणि त्याचप्रमाणे वागतही होते. संत चक्रधर स्वामींची बुध्दिनिष्ठा ही त्यांनी अनेक अंधश्रध्दा व कर्मकांडास जो विरोध दर्शविला आहे त्यावरून दिसुन येते.

३.मानवतावादी विचारसरणी :

हिंदू धर्म ज्या भारतीय सनातन वैदिक तत्वज्ञानावर आधारलेला आहे व त्याने जातीभेदजन्य उच्च नीचता निर्माण करून समाजात विषमतेचे विष पसरले हे चक्रधरस्वामींसारख्या थोर मानवतावादी विचारवंताला ही विषमता मान्य होणे शक्यच नव्हते. त्यांनी स्वत:च्या विचाराने व आचाराने हया विषमतेचा नाश करण्यासाठी सतत प्रयत्न केले. चक्रधरांनी एका चांभाराचे सामाजिक रोषापासुन संरक्षण केले, हे त्यांचे जातिभेद निर्मुलनाचेच कार्य आहे. जाती पाळणे ही अंधश्रध्दा आहे

Scanned with CamScanner

तर तिचे निर्मुलन जातीभेद न करणे हे आहे, असे त्यांचे मत होते.ब्राह्मण व शुद्र हा भेद त्यांनी मोडून काढला होता. पाणी पवित्र-अपवित्र हा भेद ही त्यांना मान्य नव्हता. कोणत्याही वर्णाच्या घरी पाणी प्या असे त्यांनी

अशा प्रकारे वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की,संत श्रीचक्रधरस्वामी हे खरोखरच मराठी साहित्यातील विद्रोही संत होते. आपली मातृभाषा गुजराती असुनही मराठी भाषेला धर्माचा उपदेश करण्याचे माध्यम बनवून त्यांनी जनतेच्या भाषेला गौरव प्राप्त करुन देऊन मराठी साहित्यात भर घातली. त्यांनी मराठी भाषेला जोपासले, वाढवले आणि व्यापक केले. शिवपुर्वकालीन अस्मितेचे प्रथम दर्शन त्यांनी घडविले. ब्राह्मणांचे वर्चस्व व स्त्री-शुद्रांची गुलामी नष्ट केली. चातुर्वर्ण्यावर हल्लाबोल करुन माणुसकीचा धर्म शिकविला. सातशे आठशे वर्षापुर्वी महाराष्ट्रात सामाजिक दृष्टीचा आणि समाजप्रबोधनाचा श्रीगणेशा करुन समाजातील अंधश्रध्दा नष्ट केल्या. जुन्या चालीरीती, परंपरा यांना बाजूला ठेवून लोकमानस आपल्या आदर्श आचरणाने प्रबुध्द करण्याचा जन्मभर प्रयत्न केला.

संदर्भः-


१. 'मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास 'पृ.१२
२. कित्ता पृष्ट क्र.१२
३. प्रा. निकम गौतम, विद्रोही संत, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव तिसरी आवृत्ती १४ एप्रिल २०१३ पृ.६,७
४. कित्ता पृष्ट क्र.८
५. कित्ता पृष्ट क्र.८
६. पाचार्य भगत रा.तु.( संपादक) 'संतसाहित्य आणि समाजप्रबोधन' दिलीपराज प्रकाशन, शनिवार पेठ पुणे पृ.३२
७. प्रा. काळे भगवान, मराठवाडयातील संत -महंत ,संकेत प्रकाशन जालना, १७ ऑक्टोबर २०१० पृ.२०
८. प्रा.सौ. खेडकर भारती, 'प्राचीन मराठी साहित्याचा अभ्यास' पृ.९
९. प्रा. निकम गौतम ' विद्राही संत' पृ.९
१०. संत साहित्य आणि समाजप्रबोधन पृ.३४
११. कित्ता पृष्ट क्र.३५
१२. प्रा. अक्षयानंद इ.स.१२०० ते १८१८ या कालखंडातील प्रमुख ग्रंथकार व त्यांच्या साहित्यकृती यांचा अभ्यास पृ.१२


Scanned with CamScanner